महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६८९ दि. ०४.०३.२०२५

**विषय:** संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ व सामान्य आदेश क्र.९८(क) दि.२३.०९.१९८० नुसार कंपनीतील गणवेश पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेश शिलाई खर्चाच्या प्रतिपूर्तीमध्ये व धुलाई भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत.

**संदर्भ:** १. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.गणवेश-२०२४/प्र.क्र.६७/जपुक(२९) दि.१०.१०.२०२४
२. संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२
३. सामान्य आदेश क्र.९८(क) दि.२३.०९.१९८०
४. प्रशासकीय परिपत्रक क्र.३६६ दि.२९.०१.२००२
५. प्रशासकीय परिपत्रक क्र.१४५ दि.२९.०८.२००८
६. प्रशासकीय परिपत्रक क्र.५५९ दि.०६.०७.२०१७

----

संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ व सामान्य आदेश क्र.९८(क) दि.२३.०९.१९८० मधील तरतुदीं नुसार गणवेश पात्र कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाई खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या रक्कमेत व धुलाई भत्त्याची रक्कम अनुक्रमे संदर्भिय क्र.५ व ६ अन्वये सुधारीत करण्यात आली होती. सदर रक्कमेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता, प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सक्षम अधिकारी यांनी महाराष्ट्र शासन, शासन निर्णय दि.१०.१०.२०२४ च्या धर्तीवर गणवेश शिलाईच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीमध्ये व धुलाई भत्त्यामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | गणवेशाचे प्रकार | सध्या प्रचलित दर | | सुधारीत दर |
|---|---|---|---|---|
| | | (मुंबई व ठाणे जिल्हयाकरिता) | (मुंबई व ठाणे जिल्हा वगळून इतर सर्व) | सर्व कार्यालयातील पात्र कर्मचाऱ्याकरीता (सुधारीत दर रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पुर्ण बाहीचा टेरिकॉटचा बुश शर्ट | रु.९०/- | रु.८०/- | पूर्ण / अर्ध बाहीचा टेरिकॉटचा बुश शर्ट रु.३००/- (प्रति शर्ट) |
| २ | अर्ध बाहीचा टेरिकॉटचा बुश शर्ट | रु.९०/- | रु.८०/- | |
| ३ | टेरिकॉटची फुल पॅन्ट | रु.१५०/- | रु.१४०/- | टेरिकॉटची फुल पॅन्ट रु.४५०/-प्रति पॅन्ट) |
| ४ | टेरिकॉट पोलका (ब्लॉऊज) | रु.८०/- | रु.७०/- | टेरिकॉटन ब्लॉऊज रु.२५०/- (प्रति ब्लॉऊज) |
| ५ | धुलाई भत्ता | रु.१००/- | | रु.२५०/ |

३. तसेच कंपनी अंतर्गत कार्यरत असणाऱ्या व जनसंपर्कात येणाऱ्या गणवेश पात्र कर्मचारी यांना गणवेश व नामपट्टीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु कर्तव्यावर असताना ज्या कर्मचाऱ्याकडून गणवेश व नामपट्टीचा वापर केला जात नाही अशा कर्मचाऱ्यांना संदर्भ क्र.४ नुसार दंडात्मक तसेच शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामधील दंडाच्या रक्कमेमध्ये ही वाढ करण्याबाबत कंपनी प्रशासनाने मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यानुसार गणवेश व नामपट्टी परिधान न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र.३६६ दि.२९.०१.२००२ नुसार आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रक्कमेमध्ये **रु. १००/-** ऐवजी **रु. २५०/-** इतकी रक्कम दंड म्हणून आकारणी करण्यात यावी.

४. गणवेश शिलाई दर हे २ (दोन) वर्षाच्या प्रत्येक गटवर्षाकरिता द्यावयाचे असुन सदरचे सुधारित दर गटवर्ष २०२४-२६ पासुन लागू राहतील. तसेच या सूचना निर्गमित होण्यापूर्वी अदा करण्यात आलेली शिलाई खर्चाची प्रतिपूर्ती व धुलाई भत्त्याबाबत पुनर्विचार करण्यात येणार नाही.

५. गणवेश शिलाईच्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याकरिता शिलाई चे देयक (बिल) हे वस्तु व सेवा कर (GST) सह सादर करणे बंधनकारक राहील. तसेच देयक सादर केल्यानंतर कर्मचाऱ्याला त्याची प्रतिपूर्ती एक महिन्याच्या आत करण्यात येईल.

६. उपरोक्त तक्त्यात नमुद केलेले गणवेश शिलाई व धुलाई भत्त्याबाबतचा सुधारीत दर हे सदरचे प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(माहिती तंत्रज्ञान)/ (वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या.,मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी,म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय,मुंबई.